ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# महिला व कौटुंबिक हिंसाचार समाजशास्त्र विभाग

**प्रा. हर्षला सूर्यवंशी**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कर्मवीर शांताराम बापू कोंडाजी वावरे कला वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय, सिडको नाशिक.

**सारांश –**

कौटुंबिक हिंसाचार अत्यंत ज्वलंत आणि प्रचंड संवेदनशील विषय आहे. यावर अजूनही मोकळेपणाने बोलले जात नाही. अजून ही समाज काय म्हणेल? या एका अत्यंत दांभिक वाक्याखाली त्रास सहन केला जातो आणि याचे बळी महिला लहान मुली आहेत कौटुंबिक हिंसाचार यामागे सगळ्यात महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे माणुसकीचा अभाव ,स्पर्धा, संघर्ष यावरून हा विषय अत्यंत नाजूक झाला आहे.

**प्रस्तावना–** भारतात पितृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. कुटुंबात पुरुषांची सत्ता असते वंश देखील त्याच्या नावाने चालतो. विवाहानंतर महिला पतीच्या घरी राहायला येते. तिचे माहेरचे नाव बदलून तिच्या नावासमोर पतीचे नाव लावले जाते कुटुंबातील महत्वाचे निर्णय पुरुषच घेत असतो. कुटुंबात स्त्रियांचा दर्जा दुय्यम असतो. स्त्रीने पतीच्या आज्ञेत रहावे. जी स्त्री पती आणि कुटुंबाची सेवा मन लावून करते ती खरी पतिव्रता असते असे मानले जाते स्त्री कितीही शिकली आणि नोकरी करत असली तरी ती पुरुषांपेक्षा कनिष्ठ असते अशी आजही पुरुषांची मानसिकता आहे. या सर्व गोष्टींवरून स्त्रियांचा दर्जा हा कसा कनिष्ठ आहे हे दिसते. भारतात विवाह हा हिंदू मधील पवित्र संस्कार मानला जातो.

भारतीय समाजात मुलगा जन्माला आल्यास आई–वडिलांना आणि त्यांच्या नातेवाईकांना विशेष आनंद होतो. या उलट मुलीच्या जन्मामुळे त्यांना आनंद होत नाही. मुलीला कुटुंबावरील भार समजला जातो ती परक्याची धन आहे असे मानले जात. ` हिंदू धर्मात पितृऋण फेडण्यासाठी मुलगा जन्माला येणे महत्त्वाचे समजले जाते. पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्रकामेष्टी' नावाचा यज्ञ देखील केला जातो. काही समाजात मुलीचा जन्म झाल्या बरोबर तिला मारून टाकले जाते आजही अशा प्रकारच्या घटना घडतात सुशिक्षित समाजात देखील मुलाला विशेष प्राधान्य दिले जात. `गर्भ जलाचे परीक्षण करून गर्भाचे लिंग जाणून घेतले जाते. स्त्रीलिंगी असलेला गर्भ पाडण्याची प्रवृत्ती आढळून येते मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून मुलाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले जाते मुलगा आपला वंशज टिकवून ठेवतो तोच खरा कुटुंबाचा वारसा आहे तो शिकून मोठा झाला तर आपल्या कुटुंबाचे नाव करील अशी आई–वडिलांची समजूत असते त्यामुळे मुलीपेक्षा मुलाला विशेष महत्त्व दिले जाते म्हणून भारतीय समाजात महिला हिंसाचार घडताना दिसून येतो.

**व्याख्या–** कौटुंबिक हिंसाचार म्हणजे" महिलांवरील शारीरिक छळ लैंगिक अत्याचार तोंडी आणि भावनिक अत्याचार आर्थिक अत्याचार म्हणजे महिलांवरील कौटुंबिक अत्याचार होय".

### कौटुंबिक हिंसाचार म्हणजे काय?

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक शाब्दिक, लेंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा, किंवा मालमत्ता, देण्यासाठी अपमानित करणे तिला शिवीगाळ करणे, विशेषतः अपत्य नसल्यामुळे तिला हिनवणे, किंवा धमकावणे त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे, किंवा पीडित महिलेला जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे व या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे म्हणजे महिलेचे स्वतःचे उत्पन्न श्रिधन मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्ते पासून तिला वंचित करणे घराबाहेर काढणे या बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते.

### परिकल्पना

1. महिलांवरील कौटुंबिक हिंसाचार प्रमाण अधिक आहे.
2. जगभरात 2020 मध्ये जागतिक महामारी असताना जगातील बहुसंख्य जनता घरात बसलेली असताना ही कौटुंबिक हिंसाचाराच्या बातम्या येत आहे

प्रगत म्हणणाऱ्या देशातही स्त्रियांना पुरुष प्रधान व तेथून येणाऱ्या अहंकाराला तोंड द्यावे लागत आहे.
Covid–19 विषाणूचा प्रसार हे एकविसाव्या शतकातही जगाची घडी विस्कटून टाकणारे संकट असल्यामुळे करोना उत्तर काळातही जग कसे असेल अशी मांडणी करायला सुरुवात

झाली आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पातळीवर ते जसे असेल तसे असो. लिंग भावाच्या पातळीवर मात्र दुर्दैवाने ते गेली हजारो वर्ष होते तसेच यापुढे राहण्याची शक्यता स्पष्ट दिसते. आजच्या काळात जगभरातील बहुसंख्य – जनताघरात बसलेली असतानाही कौटुंबिक हिंसाचाराची बातमी येत आहे वाढत आहे. या काळातील कौटुंबिक हिंसाचार याबद्दल संयुक्त राष्ट्र सरचिटणीस यांनी ही चिंता व्यक्त करावी लागली कारण ब्राझील पासून जर्मनी पर्यंत इटली पासून चीन पर्यंत सगळ्याच देशांमध्ये कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना विशेषतः मार्च महिन्यात म्हणजे लॉकडाऊन च्या काळात वाढल्या, कारण काळात कौटुंबिक हिंसाचार याविरोधात मदत मागण्यासाठी संबंधित मदत क्रमांकांवर महिलांचे फोन येण्यास सगळ्यात आधी सुरुवात झाली ती इटलीत, पण कोरोना संसर्गाच्या भीतीने अशा तक्रारी करणाऱ्या स्त्रियांना कुठेही थारा मिळाला नाही स्पेनमध्ये लॉकडाऊन च्या काळात सुरुवातीच्या दोन आठवड्याच्या काळात महिलांकडून मदत क्रमां काकडे नेहमीपेक्षा 18 टक्के जास्त दूरध्वनी आल्या आहेत तर फ्रेंड पोलिसांनी लॉकडाउनच्या काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या विरोधातील मदतीसाठी 30% नोंदले आहे. इंग्लंडमध्ये कौटुंबिक हिंसाचारापासून सुटका कशी करून घ्यावी हा सर्वाधिक विचारलेला प्रश्न होता ऑस्ट्रेलियन सरकारने कौटुंबिक समुपदेशनाच्या क्षेत्रात काम करण्यासाठी पंधरा कोटी ऑस्ट्रेलियन डॉलर्सची तरतूद तातडीने केली आहे सरकारने या काळात कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्या त्याविरोधात घरातून फोन किंवा इमेल वर संपर्क साधून शकणाऱ्या स्त्रियांनी आपल्या घराजवळ च्या औषध विक्रेत्याकडे जाऊन तक्रार करावी असे आवाहन केले . तिथे जाऊनही थेट स्पष्ट बोलू न शकणाऱ्या स्त्रियांनी मार्क 19 हे सांकेतिक अनुकरण केले असून पोलिस यंत्रणेपर्यंत पोहोचणे शक्य नसेल तर औषध विक्रेत्यांच्या दुकानात जाऊन स्त्रियांनी आपल्यावरील कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी विरोधात दाद मागावी असे आवाहन केले आहे या पार्श्वभूमीवर आपल्याकडील आकडेवारी कितीतरी जास्त आहे

मार्च 24 ते 1 एप्रिलच्या दरम्यान च्या काळात कौटुंबिक हिंसाचाराची 69 प्रकरणे आली असली आणि हेही प्रमाण नेहमीपेक्षा जास्त असले तरी प्रत्यक्ष तक्रारींना नोंदवण्याचे प्रमाण पाहून खूप जास्त असल्याचे "राष्ट्रीय महिला आयोगाचे म्हणणे आहे" त्यामागे अर्थातच अनेक कारणे असू शकतात अशी तक्रार केली तर आत्ताच्या काळात इतरत्र कुठे आश्रय मिळण्याची शक्यता नसणे पोलीस दखलच देणार नाही ही भीती वाटणे अशी तक्रार केल्याचे कळल्यानंतर सासरचा छळ आणखी वाढेल अशी शक्यता वाटणे अशा अनेक कारणांमुळे स्त्रिया सध याच्या लॉकडाउनच्या काळात घरात चार भिंतीच्या आत तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत असल्याची शक्यता अधिक आहे विरोधात आधीच बोलता येणे कठीण त्यात काळाने आणि परिस्थितीने हात बांधलेले असल्याने इतर सर्व परिणामांमुळे कौटुंबिक हिंसेच्या तक्रारीं मध्ये वाढ होणे हा सगळ्यात भयावह परिणाम म्हणायला हवा आणि तथाकथित प्रगत, विकसित देश त्याबाबत मागे नसणे ही बाब प्रगतीच्या विकासाच्या निकषांवर प्रश्न चिन्ह उपस्थित करणारी आहे मानस शास्त्रज्ञांच्या मते सध्याच्या परिस्थितीतून येत असलेल्या वैफल्यातून कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार वाढले असावेत पण करोणा मुळे निर्माण झालेली. जीवाची भीती सतत घरी बसावे लागणे अर्थव्यवस्थेचे संभाव्य, परिणाम, नोकऱ्या जाण्याची, मोठ्या आर्थिक फटका बसण्याची भीती या सगळ्यांचा परिणाम सगळ्यांच्याच मानसिकतेवर होतो आहे या परिस्थितीत घरी राहून काम करणाऱ्या स्त्रियांना तर कार्यालयीन काम कामाबरोबरच नेहमी प्रमाणे घराचे व्यवस्थापन घरगुती कामासाठी मदतनिस स्त्रिया येऊ शकत नसल्यामुळे, तो भाग नवरा मुले सगळेच घरी असल्यामुळे पडणारे अतिरिक्त काम यातूनही कौटुंबिक हिंसाचार महिलांवर होताना दिसून येत आहे .

1. महिलांना बाहेर कुठेही जाता येत नाही आणि घरातील महिलांवर अत्याचार करणे सहज शक्य असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचार लॉकडाऊनच्या काळात वाढला आहे असे दिसून येते.
2. भारतात आणि प्रगत देशातही महिलांवरील अत्याचार वाढ नोंदवली गेली आहे .
3. लॉकडाऊनच्या काळात महिला अधिक असुरक्षित असल्याचे दिसून आले.
4. लहान बालकांवरील अत्याचार बलात्कार याचे प्रमाण कमी झाले असले तरी थांबलेले नाही.
5. कौटुंबिक हिंसाचार, लग्न संबंधातील बलात्कार घटस्फोट ही प्रकरणे मात्र वाढत आहे.
6. Covid –19 आळा घालण्यासाठी देशात लॉकडाऊन सुरू झाले तेव्हापासून घरातील सर्व सदस्य अगदी लहान शालेय मुले किशोरवयीन महिला पुरुषांनी घरातील वृद्ध असे सगळे खरोखर घरात राहत आहेत. यामध्ये कोणाची घरं लहान आहेत कोणाची मोठी तरी देखील महिलांवरील

अन्याय व अत्याचार वाढलेला दिसून येतो.

**कौटुंबिक हिंसाचार –**

स्त्रियांच्या होणाऱ्या कौटुंबिक छळास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 व नियम 2006 संपूर्ण 26 ऑक्टोबर 2006 पासून लागू केला. कायद्याची माहिती नसेल तर त्याचा पीडित महिला लाभ घेऊ शकत नाही. कौटुंबिक हिंसाचार कशास म्हणावे हे सर्वसामान्यांना समजावे एवढ्यासाठीच हा अल्पसा प्रपंच. वास्तविक स्त्री ज्या परिवारासोबत वा साथीदारासोबत एकाच छताखाली रहात असेल आणि तिचा छळ त्या पुरुषाकडून होत असेल तर ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये न्याय दंडाधिकारी याकडे संरक्षण मागू शकते. थोडक्यात पीडित महिला व तिच्या मुलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षितेचा आर्थिक संरक्षणाचा आदेश न्याय दंडाधिकारी देऊ शकतात. छळापासून संरक्षण मग ते शारीरिक लैंगिक आर्थिक तोंडी किंवा भावनिक अत्याचार असोत महिलांना त्याविरुध्द न्याय मागता येतो.

***संदर्भ सूची***


1. *डॉ. आगलावे प्रदीप. 2008. भारतीय समाज संरचना आणि समस्या". ललिता पुराणिक, श्री साईनाथ प्रकाशन*
2. *श्रुती. तांबे. 2000. ''अस्तित्व संघर्ष आणि सार्वभोमत्व" रोहिणी गवाणकर, महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ*
3. *(स्त्री अभ्यासाचा समोरील आव्हाने)*
4. *लोकसत्ता, 11 एप्रिल 2020*
5. *विकिपीडिया*